महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, मुंबई शहर

**(आस्थापना शाखा)**

दूरध्वनी क्र.०२२ २२६६५२३३
E-mail:estmumbaicity@gmail.com

जुने जकात घर, शहीद भगत सिंग मार्ग,
फोर्ट, मुंबई – ४०० ००१

क्र.आस्था/टे ४/जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी/जाहिरात/२०२३ / 1856 दिनांक 07 DEC 2023

# जाहिरात

## "जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी (कंत्राटी)" भरती करीता अटी, शर्ती व कामाचे स्वरुप

जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा यांचेकरीता महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र.आव्यप्र-२००७/प्र.क्र.१२५/आव्यप्र-१ दिनांक २१ जानेवारी २०१० व शासन निर्णय क्र.आव्यप्र-२०१५/प्र.क्र.७५/आव्यप्र-१ दि.०२ फेब्रुवारी २०१९ नुसार कंत्राटी पध्दतीने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पद भरणेचे आहे. महसूल प्रशासनातील जिल्हा **"महाराष्ट्र आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम"** या नावाचा तत्सम कार्यक्रम जिल्हयात राबविणे तसेच कार्यक्रमाची सफलता व सकारात्मक फलनिष्पती लक्षात घेवून जिल्हा पातळीवर आराखडा निर्मिती, विविध अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण व उदबोधन तसेच वेगवेगळया स्तरावर जनजागृती करणे या दृष्टीकोनातून जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा यांचे कार्यालयात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी हे पद कंत्राटी पध्दतीने (११ महिन्यांच्या कालावधीसाठी) भरणेचे आहे. याकरीता इच्छुक उमेदवारांकडून जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा, जुने जकात घर, शहीद भगत सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई -४०० ००१ यांचे कार्यालयात **दि.२७/१२/२०२३** पर्यंत अर्ज मागविणेत येत आहेत. **तद्नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा** विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांचे पद खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून भरण्यात येणार आहे.

**अ)** सदर पदाची नेमणूक ही पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शासकीय अधिकारी म्हणून गणला जाणार नाही.

**ब)** सदर नेमणूक ही करार पध्दतीने ११ महिन्यासाठी करण्यात येईल.

**१.मानधन**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांचे दरमहा मानधन रु.४५,०००/- (रु.पंचेचाळीस हजार मात्र)

२. शैक्षणिक अर्हता व अनुभव:

१) शैक्षणिक अर्हता : मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी/ पदव्युत्तर पदवी
(सामाजिक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन)

२) अनुभव : १.आपत्ती व्यवस्थापनातील कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

२.मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असणे इष्ट.

३.टिप्पणी लेखन, अहवाल लेखन यामध्ये विशेष प्राविण्य,

**३) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांची निवड :**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांची निवड जिल्हा निवड समितीच्या अखत्यारित राहिल. जिल्हाधिकारी, मुंबई शहर जिल्हा हे नियुक्ती प्राधिकारी असतील.

**४) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या :**

१) जिल्हा आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे व त्यांचे अद्यावतीकरण, विचारविनिमय कार्यशाळा आयोजित करणे, आराखड्याची व्यवहार्यता तपासणे, रंगीत तालमी घेणे, आपत्ती व्यवस्थापन संबंधी विभागाचे आराखडे तयार करणे.

२) **संस्थात्मक मजबूतीकरण** : जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मजबूतीकरण, पूर्वतयारी संबंधात अशासकीय संस्थाचे बोट क्लब, HAM गट इ. संस्थांची सज्जता, आपत्ती व्यवस्थापनाशी निगडीत अशासकीय संस्थांचे प्रशिक्षण, सामाजिक कार्य महाविद्यालय, इस्पितळांची सज्जता, जिल्हा आपत्कालीन कार्य केंद्रांची सज्जता.

३) **प्रशिक्षण व सक्षमीकरण** : प्रशासन, अभियंते, वास्तूविशारद, डॉक्टर्स, पॅरामेडीकल्स, गवंडी, विद्यार्थी व शिक्षक, प्रसार माध्यमे, उद्योग जगत यांचे प्रशिक्षण व सक्षमीकरण.

४) **जनजागृती कार्यक्रम** : रोड शो, लोकगीते, पोवाडे, पथनाटय, भिंत्ती चित्रे, जाहीरात फलक, पोस्टर स्पर्धा, निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, अभ्यासक्रमाव्यतिरिक्त स्पर्धांचे आयोजन, रेडीयो जिंगल्स, इत्यादीमधून जनजागृती करणे.

राजेंद्र क्षीरसागर

(राजेंद्र क्षीरसागर)
~~जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष~~
जिल्हा निवड समिती
मुंबई शहर जिल्हा

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी - कंत्राटी पदासाठी अर्ज

प्रति,
जिल्हाधिकारी,
मुंबई शहर जिल्हा,
जुने जकात घर,
शहीद भगत सिंग मार्ग,
फोर्ट, मुंबई -४०० ००१.

फोटोवर स्वत:ची स्वाक्षरी करावी.

महोदय,

मी " जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी - कंत्राटी " पदासाठी अर्ज करीत असून माझा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. संपूर्ण नांव :
(आडनांव प्रथम लिहावे)

२. पत्रव्यवहाराचा पत्ता :

३. अर्जदाराची जन्मतारीख :

४. दि.११.१२.२०२३ रोजीचे वय : ____ वर्षे________महिने_______दिवस

५. अर्जदाराचा ई-मेल आयडी :

६. अर्जदाराचा भ्रमणध्वनी क्रमांक :

७. अर्जदाराची शैक्षणिक अर्हता :-

| शैक्षणिक पात्रता | विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | एकूण मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| पदवी | | | | |
| पदव्युत्तर | | | | |
| | | | | |

१०. आपत्ती व्यवस्थापनातील अनुभवाचा तपशिल :

| अ.क्र. | वर्ष | आपत्ती व्यवस्थापनातील अनुभवाचा तपशिल |
|---|---|---|
| | | |
| | | |

अर्जदारांनी उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने,

५) शाळा सोडल्याचा दाखला/जन्म दाखला

६) पदवी/पदव्युत्तर प्रमाणपत्र

७) मान्यता प्राप्त विद्यापीठाची सामाजिक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन पदवी

८) आपत्ती व्यवस्थापन अनुभवाची प्रमाणपत्रे इ. बाबींच्या सांक्षाकीत प्रती पुरावा म्हणून अर्जासोबत सादर कराव्यात.

## घोषणापत्र

६) अर्जदाराकाडे सामाजिक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन पदवी आहे काय ? आहे / नाही

७) अर्जदारास आपत्ती व्यवस्थापनाचा अनुभव आहे काय ? आहे / नाही

८) अर्जदारास मराठी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान आहे काय ? आहे / नाही

९) अर्जदारास टिप्पणी लेखन व अहवाल लेखनाचे पुरेसे ज्ञान आहे काय ? आहे / नाही

१०) अर्जदारास शासकीय कामाचा अनुभव आहे काय ? आहे / नाही

मी असे प्रमाणित करतो/ करते की, वर नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे सत्य व बरोबर आहे. वर दिलेली माहिती खोटी आढळून आल्यास निवड होण्यास मी अपात्र राहीन व भारतीय दंड संहितेअंतर्गत कारावाईस पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :-**

**दिनांक :-** **अर्जदाराची सही**

## अर्जासोबत जोडावयाच्या कुटूंबाचा प्रतिज्ञापत्राचा नमुना

## प्रतिज्ञापत्र

## नमुना-अ

मी श्री/श्रीमती ------------------------------------------------------------------

श्री. -------------------------------------- यांचा मुलगा/मुलगी/पत्नी वय वर्ष, ----------------

राहणार - ------------------------------------------------ यान्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१. मी शिपाई या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला______ इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८/०५/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या _______ आहे.

३. हयात मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेलतर २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यासाठी पात्र होईन, याची मला जाणीव आहे.

ठिकाण:-

उमेदवाराची सही

दिनांक :-